## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या मंगळवार दि. १७ ऑगस्ट २०१० रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची १३० वी बैठक मंगळवार दि.१७ ऑगस्ट २०१० रोजी दुपारी ३.०० वा. गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृहात संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. सुभाष हजारे,भा.प्र.से. | उप सभापती तथा मुख्य अधिकारी |
| २) | मा. श्री. नंदकुमार काळे | सदस्य |
| ३) | मा.श्री.बशीर पटेल | सदस्य |
| ४) | मा. श्री. गजेंद्र लष्करी | सदस्य |
| ५) | मा.श्री.कमरुद्दीन मर्चंट | सदस्य |
| ६) | मा. श्री. किसन बा. जाधव | सदस्य |
| ७) | मा. श्रीमती सुरेखा पाटील | सदस्या |
| ८) | मा.श्री.सईद खान | सदस्य |
| ९) | मा.श्रीमती उल्का पाटकर | सदस्या |
| १०) | मा.श्री.शरद शिरीषकर | सदस्य |
| ११) | मा.श्री.सुबोध बांदिवडेकर | सदस्य |
| १२) | मा.श्री.व्ही.जी.नायर | सदस्य |
| १३) | मा.श्री.हेमराज शाह | सदस्य |
| १४) | श्री.पी.पी.महिषी,<br>निवासी कार्यकारी अभियंता | सचिव |
| १५) | श्री.ओ.बी.साहू | सह मुख्य अधिकारी |
| १६) | डॉ.श्री.पुलकुंडवार | कार्यासन अधिकारी |

मा.श्री.हरिष सणस व श्री.तारीक फारुकी या सदस्यांनी अनिवार्य कारणास्तव बैठकीत उपस्थित रहाणे शक्य नसल्याचे दूरध्वनीवरुन कळविले होते. सचिव श्री.महिषी यांनी उपस्थित सर्व सन्मा.सदस्यांचे स्वागत करुन मा. सभापती यांच्या परवानगीने बैठकीच्या कामकाजास सुरुवात केली. बैठकीच्या सुरुवातीस मा. उपसभापती तथा मुख्य अधिकारी यांच्या आईचे नुकतेच निधन झाले असल्याने उपस्थित सर्व सन्मा. सदस्य,अधिकारी, कर्मचारी यांनी २ मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली वाहिली.

बैठकीच्या सुरुवातीस सन्मा.सदस्य यांनी ज्या २ इमारती कोसळून अपघात झालेला आहे, त्याबद्दल माहिती विचारली. श्री.पटेल, उपमुख्य अभियंता (परिमंडळ- ३) यांनी या संदर्भात पुढीलप्रमाणे माहिती दिली. आशिर्वाद ही पुनर्रचित इमारतीमधील गाळा क्र.१२७ चे छताचे प्लास्टर पडून एका माणसाचा मृत्यू झालेला आहे. सदर इमारत ही १९७८ साली पुनर्रचित करण्यात आली असून सदर इमारतीचे विशेष दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आलेले होते. सदर इमारतीच्या दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार करताना गाळा क्र.१२७ मधील छताचे प्लास्टरचे काम घेण्यात आले नव्हते. कारण सदर इमारतीच्या पाहणीच्यावेळी गाळयामधील छताच्या प्लॅस्टरला फुगवटा किंवा तडे पडल्याचे निदर्शनास आले नव्हते. सदर छताचे प्लॅस्टर

अचानकपणे पडणे हा एक अपघात आहे. त्या इमारतीचे बाहेरील काम करण्यात आले होते व काही गाळयातील अंतर्गत दुरुस्तीचे काम सुरु करण्यात येणार होते. तसेच लक्ष्मीनिवास परेल या इमारतीचा धोकादायक भाग खाली करण्यात आलेला होता, तोच भाग पडलेला आहे. इमारतीतील शिल्लक रहिवाशांना संक्रमण शिबीरात हलविण्यात आलेले आहे. यावर काही सन्मा.सदस्यांनी अधिका-यांचे या कामाकडे दुर्लक्ष झाल्याचे म्हटले. त्यावर श्री.पटेल, उपमुख्य अभियंता (परिमंडळ-३) यांनी असे सांगितले की, सन्मा.सदस्यांनी सूचविल्याप्रमाणे १५ दिवसाचे आत दुरुस्तीचे आवश्यकतेनुसार काम हाती घेण्यात येईल असे कळविले. या इमारतीत एकूण ३८ भाडेकरु होते, त्यापैकी शिल्लक १२ भाडेकरुंना संक्रमण शिबीरात हलविण्यात आलेले आहे. लक्ष्मीनिवास या इमारतीस खाली करण्याबाबत प्राधान्याने केलेल्या कार्यवाहीबद्दल सन्मा.सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी श्री.पटेल, उपमुख्य अभियंता (परिमंडळ-३) व श्री.हावळ, कार्यकारी अभियंता यांचे अभिनंदन केले.

उपकरप्राप्त इमारतीतील भाडेकरु/रहिवाशांची पात्रता व त्यांना अनुज्ञेय असलेले क्षेत्र ठरविण्याबाबतची कार्यपध्दती विहित करण्याबाबतचा शासन निर्णय क्र.लोकआ २००७/प्र.क्र.१२० (अ)/दुवपु-१, दि.१६ ऑगस्ट,२०१० च्या प्रती सर्व सन्मा.सदस्यांना सभागृहात देण्यात आल्या.

**बाब क्रमांक - १३०.१**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची दि.२८/०७/२०१० रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत.

मागील बैठकीचे कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ.क्र.०१ ते ०९ वर सादर करण्यात आले.

मा.सदस्य श्री.गजेंद्र लष्करी यांनी बँकेमार्फत भाडेवसुलीचे पुढे काय झाले, अशी विचारणा केली असता मुख्य लेखा अधिकारी यांनी बँकेमार्फत भाडेवसुली ऑक्टोबर महिन्यापासून सुरु होईल असे सांगितले. त्यावर मा.मुख्य अधिकारी यांनी मुख्य लेखा अधिकारी व उपमुख्य अधिकारी (पु.गा.) यांना असे सांगितले की, बँकेबरोबर करण्यात येणा-या करारनाम्याचा मसुदा लवकरात लवकर अंतिम करण्यात यावा. तसेच सर्व कार्यकारी अभियंता यांनी त्यांचेकडील सर्व पुनर्रचित इमारतीमधील गाळयांची संगणीकृत माहिती आवश्यक त्या नमुन्यात लवकरात लवकर तयार करुन मंडळाकडे सादर करावी. जेणे करुन बँकेला देता येईल. सर्व उपमुख्य अभिंता यांनी हे काम प्राधान्याने करावयाचे आहे.

तसेच मा.सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी जर एखादा भाडेकरु वर्षभराचे भाडे आगावू (advance) भरत असेल तर, त्याला त्यात काहीतरी सुट देण्यात यावी, असे मागिल बैठकीत सूचविल्यानुसार त्यावर काय कार्यवाही करण्यात आली अशी विचारणा केली असता श्री.ढोले, उपमुख्य अभियंता (परिमडळ-१) यांनी जो प्रस्ताव सादर केलेला आहे त्यामध्ये महानगरपालिका, बेस्ट येथे अशी सवलत दिली जाते का याबद्दलची माहिती देण्यात आलेली नसल्याने शासकिय अथवा शासन अंगीकृत व्यवसायाकडील माहिती घेऊन प्रस्ताव सादर करण्याबाबत मा.मुख्य अधिकारी यांनी श्री.ढोले, उपमुख्य अभियंता (परिमंडळ-१) यांना सूचना दिल्या.

मा.सदस्य श्री. गजेंद्र लष्करी यांनी मागील बैठकीत कम्युनिटी हॉल उपलबध होणेबाबत काय कार्यवाही करण्यात आली अशी विचारणा केली असता, मा.मुख्य अधिकारी यांनी असे सांगितले की, सदर प्रस्ताव मुंबई मंडळाने वेगळया पध्दतीने मान्य केलेला आहे व यासंदर्भातील मुख्य अधिकारी/मुंबई मंडळ

यांच्या दि.०६/०८/२०१० च्या पत्रातील मजकूर वाचून दाखविला. त्यामध्ये त्यांनी माझगांव येथे डी.सी.आर.अनुसार रहिवाशांना सुविधा पुरविण्याकरीता राखीव भूखंड आहे. या भूखंडाचा विकास महानगरपालिकेच्या निर्देशाप्रमाणे करणे अपेक्षित आहे. तरीही या भूखंडावर पुरविण्यात येणा-या सुविधांचे नियोजन करुन नकाशे मंजुरीसाठी म्हाडातर्फे महानगरपालिकेस सादर केले आहेत. सदरहू नियोजनामध्ये २४.७० x ८.६५ मी. व २१.०० x ८.६५ मी. आकारमानाचे दोन कम्युनिटी हॉल बांधण्याचे प्रस्तावित आहे. सदर भूखंडावर म्हाडामार्फत बांधकाम करण्याची अनुमती देण्याविषयी महानगरपालिकेकडे व शासनास मुंबई मंडळातर्फे विनंती करण्यात आली आहे. त्यामुळे नजिकच्या काळात माझगांवसारख्या मध्यवर्ती ठिकाणी मंडळास दोन कम्युनिटी हॉल उपलब्ध होतील.

मा.सदस्य श्री. किसन जाधव यांनी व्हेकेशन नोटीसबाबत कोणती कार्यवाही करण्यांत आली याबाबत विचारणा केली असता व्हेकेशन नोटीस अंतिम करुन बुकलेट तयार करण्याचे काम पुर्ण झालेले आहे, तरी पुढील बैठकीच्या आधी सर्व सन्मा.सदस्यांना त्याच्या प्रती देण्यात येतील, असे सहमुख्य अधिकारी यांनी सांगितले.

मा. सदस्य श्री.किसन जाधव यांनी उमरखाडी येथील साईकृपा , ओमकार अशा ज्या पीएमजीपी तर्फे पुनर्रचित झालेल्या इमारती जुन्या झालेल्या असल्यामुळे त्या ठिकाणी नवीन इमारती बांधण्याबाबत क्लस्टर डेव्हलपमेंन्ट ३३ ( ९) खाली अथवा प्रस्तावित ३३ (७) च्या संयुक्त पुनर्विकासाच्या धोरणानुसार कार्यवाही करण्याकरीता मा.आमदार श्री.अमिन पटेल यांनी भाडेकरुंच्या सहमतीचा विचार करुन मा.मुख्यमंत्री यांचेबरोबर चर्चा करुन त्यांना लवकरात लवकर सदर प्रस्ताव सादर करण्याबाबत आश्वासन दिल्याचे सांगितले.

सर्व सदस्यांनी मा.मुख्य अधिकारी यांचे असे निदर्शनास आणले की, त्यांनी ज्या प्रमाणे धारावी येथील संक्रमण शिबिराची पहाणी केली, त्या प्रमाणे अन्य संक्रमण शिबीरांची त्यांना पहाणी करावयाची आहे. यावर मा.मुख्य अधिकारी यांनी असे सांगितले की, सर्व सदस्यांनी तारीख व वेळ ठरवून संबंधित उपमुख्य अभियंता व कार्यकारी अभियंता यांना कळवावी. त्याप्रमाणे संबंधित उपमुख्य अभियंता व कार्यकारी अभियंता हे संक्रमण शिबीराची पहाणी करतेवेळी त्यांचेसोबत उपस्थित राहतील.

सचिव यांनी असे सांगितले की, मंडळाच्या दि.२८/०७/२०१० रोजी झालेल्या १२९ व्या बैठकीत बाब टिप्पणी क्र.१२९.५(२) अन्वये परिमंडळ-२ अंतर्गत ग/द विभागातील एकूण ५ दुरुस्तीच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्यापैकी अनु.क्र.३ वरील ५२ सी, अंबालाल चाळ, डॉ.ॲनी बेझंट रोड,वरळी येथील इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.१३,६५,८७७/- एवढया रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. परंतु मान्यता दिलेल्या गोषाव-यात निव्वळ टप्प्याची रक्कम ही रकान्यात टंकलिखित चुकीने रु.५,५३,५७३/- ऐवजी रु.३,६२,२०५/- एवढी दर्शविण्यात आली होती. तरी सदर अंदाजपत्रकीय रक्कमेत सुधारणा करणेबाबत प्रस्ताव मंडळापुढे सादर करण्यात आलेला आह. सदर सुधारणा केल्याने प्रशासकीय मान्यता दिलेल्या रक्कमेत काहीही बदल होणार नाही. सर्व सन्मा.सदस्यांनी सदर सुधारणा करण्यास मान्यता दिली.

वरील सविस्तर चर्चेअंती मा.सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्ती करण्याची नोंद घेवून कार्यवृत्तांत स्थायी करण्यात आले.

**बाब क्रमांक - १३०.२**

विषय - **पुनर्विकास**

मुंबई बेटावरील अ वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाकरीता ना हकरत प्रमाणपत्र देण्याबाबतचे प्रस्ताव.

१. अंतिम भुखंड क्र.४६८-टी.पी.एस.-४-माहिम विभाग, इमारत क्र.२०-डी व ७८५-ए-डी, के.व्ही.चीतळे पथ, दादर (प), मुंबई ४०००२८ येथील **"कवळी वाडी" ग-उत्तर विभाग.**

२. अंतिम भुखंड क्र.१४८७ व ४५६, टी.पी.एस.-३-माहिम विभाग, इमारत क्र.३-३सी, पितांबर लेन, माहीम, मुंबई ४०००१६ येथील **"जगदीश भुवन" ग-उत्तर विभाग.**

३. भुकर पहाणी क्र.१८८-ए/१०, माटुंगा विभाग, प्लॉट क्र.२०९-बी, दादर माटुंगा इस्टेट, इ.क्र.६०, डॉ.बी.ए.रोड, माटुंगा, मुंबई ४०००१९, येथील **"देवी सदन" 'फ-उत्तर'.**

४. भुकर पहाणी क्र.८६६ व ८६७ लोअर परळ विभाग, इमारत क्र.१०/२, ४ व ४ए फीतवाला रोड, एलफिन्सटन रोड, मुंबई ४०००१३ येथील **"जमुना रजब चाळ" ग-दक्षिण विभाग.**

५. भुकर पहाणी क्र.१७२३ व १७२४, मांडवी विभाग, इ.क्र.१६०-१६२, १६४-१६६, शायदा मार्ग,मुंबई ४००००९ येथील **'फातमा मंझील' 'बी विभाग'**

६. भुकर पहाणी क्र.२७९, ताडदेव विभाग इ.क्र.१८-२०, २०-सी व २०-डी, स्लेटर रोड, मुंबई ४००००७ येथील **'विमब्रिज कंपाऊंड' डी-२ विभाग.**

७. भुकर पहाणी क्र.८२९, गिरगाव विभाग इ.क्र.१९-२१खंबाटा लेन, मुंबई ४००००४ येथील **"मुलतानी बिल्डिंग" डी-२ विभाग.**

८. भुकर पहाणी क्र.२२८, गिरगाव विभाग इ.क्र.११९-२१, १२३अे, खाडिलकर रोड, गिरगाव, मुंबई येथील **"साई सदन" डी-१ विभाग.**

९. भुकर पहाणी क्र. ११८६ व ११८७ भायखळा विभाग इ.क्र. ५३-५७ आणि ५९-६३ हुजुरिया स्ट्रिट, मुंबई-०८ येथील **"कुरेशी मंझिल व पासोबा बिल्डिंग" 'ई विभाग'.**

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ११ ते ४७ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत. सचिव यांनी मा.सदस्यांना असे सांगितले की, फातमा मंझील म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासाकरीता ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत पूरक टिप्पणी पृष्ठ क्र.२७ ते २९ वर विचारार्थ व निर्णयार्थ सादर करण्यात आलेली आहे. या मालमत्तांचा एकत्रित पुनर्विकास प्रस्तावित आहे. उक्त मालमत्तेवरील भाडेकरु/रहिवाश्यांना दिलेली संमतीपत्रे ही अपरिवर्तनीय असून, ती रु.१००/- च्या स्टॅम्पपेपरवर निष्पादित केलेली आहेत व सदर संमतीपत्रातील अटी व शर्तीनुसार त्यांनी शपथेवर लिहून दिलेले आहे की, उक्त पुनर्विकासाच्या योजनेत स्वेच्छेने सहभागी होत असून, म्हाडा/मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाविरुध्द कोणत्याही स्वरुपाच्या अधिकाराचा दावा करणार नाही. तसेच सदर पुनर्विकासाच्यां योजनेचे नकाशे,सुखसोयी, देखभालीचा खर्च, संक्रमणकालिन व्यवस्था इ.बाबत जमीन मालकाने दिलेल्या माहितीबद्दल संतुष्ट असून, कोणत्याही दबावाखाली न येता अपरिवर्तनीय संमतीपत्र देत असल्याचे भाडेकरु/रहिवाश्यांनी नमूद केले आहे. परंतु तद्नंतर सदर रहिवाश्यांनी त्यांनी दिलेली संमतीपत्रे मागे घेत असल्याबद्दल पत्र दिले आहे. सदर संमतीपत्रे ही फार जुनी म्हणजे ५/६ वर्षापूर्वी दिलेली

नसून ती प्रस्ताव सादर करण्याआधी दिलेली आहेत. उपमुख्य अभियंता व कार्यकारी अभियंता यांनी सांगीतले की, त्यांनी स्वतः स्थळनिरिक्षणाच्यावेळीही सदर संमतीपत्राची खात्री केलेली आहे. त्यावेळी कोणत्याही रहिवाशांनी त्यास विरोध केलेला नव्हता. त्यांनी स्वतः त्याची पडताळणी केलेली आहे. त्यामुळे सदर बाबतीत विचार व्हावा. त्यावर सर्व सन्मा.सदस्यांनी पुनर्विकासाच्या प्रस्तावास एकमताने मान्यता देण्याचे ठरले. सदर प्रस्तावांबाबत सचिव यांनी मा.सदस्यांना थोडक्यात माहिती दिली व प्रस्तावावर चर्चा होऊन चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३०/११०९**

मुंबई बेटावरील खालील ९ मालमत्तांवरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचे प्रस्तावांत नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

१. अंतिम भुखंड क्र.४६८-टी.पी.एस.-४-माहिम विभाग, इमारत क्र.२०-डी व ७८५-ए-डी, के.व्ही.चीतळे पथ, दादर (प), मुंबई ४०००२८ येथील **''कवळी वाडी'' ग-उत्तर विभाग**.

२. अंतिम भुखंड क्र.१४८७ व ४५६, टी.पी.एस.-३-माहिम विभाग, इमारत क्र.३-३सी, पितांबर लेन, माहीम, मुंबई ४०००१६ येथील **''जगदीश भुवन'' ग-उत्तर विभाग**.

३. भुकर पहाणी क्र.१८८-ए/१०, माटुंगा विभाग, प्लॉट क्र.२०९-बी, दादर माटुंगा इस्टेट, इ.क्र.६०, डॉ.बी.ए.रोड, माटुंगा, मुंबई ४०००१९, येथील **''देवी सदन'' 'फ-उत्तर'**.

४. भुकर पहाणी क्र.८६६ व ८६७ लोअर परळ विभाग, इमारत क्र.१०/२, ४ व ४ए फीतवाला रोड, एलफिन्सटन रोड, मुंबई ४०००१३ येथील **''जमुना रजब चाळ'' ग-दक्षिण विभाग.**

५. भुकर पहाणी क्र.१७२३ व १७२४, मांडवी विभाग, इ.क्र.१६०-१६२, १६४-१६६, शायदा मार्ग,मुंबई ४००००९ येथील **'फातमा मंझील' 'बी विभाग'**

६. भुकर पहाणी क्र.२७९, ताडदेव विभाग इ.क्र.१८-२०, २०-सी व २०-डी, स्लेटर रोड, मुंबई ४००००७ येथील **'विमब्रिज कंपाऊंड' डी-२ विभाग**.

७. भुकर पहाणी क्र.८२९, गिरगाव विभाग इ.क्र.१९-२१खंबाटा लेन, मुंबई ४००००४ येथील **''मुलतानी बिल्डिंग'' डी-२ विभाग.**

८. भुकर पहाणी क्र.२२८, गिरगाव विभाग इ.क्र.११९-२१, १२३अे, खाडिलकर रोड, गिरगाव, मुंबई येथील **''साई सदन'' डी-१ विभाग.**

९. भुकर पहाणी क्र. ११८६ व ११८७ भायखळा विभाग इ.क्र. ५३-५७ आणि ५९-६३ हुजुरिया स्ट्रिट, मुंबई-०८ येथील **''कुरेशी मंझिल व पासोबा बिल्डिंग'' 'ई विभाग'.**

**बाब क्रमांक - १३०.३**

विषय - विकास नियंत्रण नियमावली **३३(६)** अन्वये पुनर्विकासाचे प्रकरण विकास नियंत्रण नियमावली **३३(७)** मध्ये रुपांतरित करुन पुनर्विकास करण्यास ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत....

भुकर पहाणी क्र.८२, मांडवी विभाग, **इ.क्र.२४८ नागदेवी स्ट्रिट. 'ब विभाग'**

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ४९ ते ५३ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३०/१११०**

भुकर पहाणी क्र.८२, मांडवी विभाग, इ.क्र.२४८ नागदेवी स्ट्रिट. 'ब विभाग' येथील मालमत्तेचा विकास नियंत्रण नियमावली ३३(६) मधून सुधारित विकास नियंत्रण नियमावली ३३(७) मध्ये रुपांतरित करुन पुनर्विकास करण्यास ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याबाबत मंजूरी दिली.

**आयत्यावेळेचे विषय**

**बाब क्रमांक - १३०.४ (१ अ)**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-१ मधील दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रके व नकाशांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे. परिमंडळ-१ मधील (अ,ब,सी-१/२/३ विभाग) ११ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ५५ ते ५९ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३०/११११**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण ११ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.२,७६,००,६१५/-(रुपये दोन कोटी,छहात्तर लक्ष,सहाशे पंधरा फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.१,२५,६३,५२४/- (रुपये एक कोटी, पंचवीस लक्ष,त्रेसष्ट हजार, पाचशे चोवीस फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

**बाब क्रमांक - १३०.४** (१ब)

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-१ मधील दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रके व नकाशांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे. परिमंडळ-१ मधील (अ,ब,सी-१/२/३ विभाग) १२ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ६१ ते ६७ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३०/१११२**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण १२ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.२,८४,९६,९६०/-(रुपये दोन कोटी,चौऱ्याऐंशी लक्ष,शहाण्णव हजार,नऊशे साठ फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.१,४१,२६,५५०/- (रुपये एक कोटी, एक्केचाळीस लक्ष,सव्वीस हजार, पाचशे पन्नास फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

**बाब क्रमांक - १३०.५** (१अ)

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-२ मधील दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रके व नकाशांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे. परिमंडळ-२ मधील (डी-१,डी-२,ग-दक्षिण) ११ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ६९ ते ७१ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३०/१११३**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण ११ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.२,०२,०६,०५७/-(रुपये दोन कोटी,दोन लक्ष,सहा हजार, सत्तावन्न फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.१,३६,५१,५४६/- (रुपये एक कोटी, छत्तीस लक्ष,एकाव्वन्न हजार, पाचशे सेहेचाळीस फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

**बाब क्रमांक - १३०.५** (१ब)

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-२ मधील दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रके व नकाशांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे. परिमंडळ-२ मधील (डी-१,डी-२,ग-दक्षिण) ०३ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ७३ ते ७५ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३०/१११४**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण ०३ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.१,०७,४४,८५७/-(रुपये एक कोटी,सात लक्ष,चव्वेचाळीस हजार, आठशे सत्तावन्न फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.४२,४५,२८५/- (रुपये बेचाळीस लक्ष, पंचेचाळीस हजार, दोनशे पंच्याऐंशी फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

**बाब क्रमांक - १३०.५** (१ब)

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-२ मधील दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रके व नकाशांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे. परिमंडळ-२ मधील (डी-१,डी-२,ग-दक्षिण) ०३ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ७३ ते ७५ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३०/१११५**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण ०३ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.१,०७,४४,८५७/-(रुपये एक कोटी,सात लक्ष,चव्वेचाळीस हजार, आठशे सत्तावन्न फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.४२,४५,२८५/- (रुपये बेचाळीस लक्ष, पंचेचाळीस हजार, दोनशे पंच्याऐंशी फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

**बाब क्रमांक - १३०.६**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-३ मधील दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रके व नकाशांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे. परिमंडळ-३ मधील (ई-१,ई-२,फ-दक्षिण) १२ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ७७ ते ८१ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३०/१११६**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण १२ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.२,३५,०२,३५१/-(रुपये दोन कोटी,पस्तीस लक्ष,दोन हजार, तीनशे एक्कावन्न फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.१,३२,९३,५३०/- (रुपये एक कोटी, बत्तीस लक्ष,त्र्याण्णव हजार, पाचशे तीस फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

**बाब क्रमांक - १३०.७**

विषय - मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या परिमंडळ-३ मधील दुरुस्ती कामांच्या मुळ व सुधारित अंदाजपत्रके व नकाशांना प्रशासकीय मान्यता प्रदान करणे. परिमंडळ-४ मधील (फ/उ व ग/उ विभाग) ०५ इमारती.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.८३ ते ८५ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३०/१११७**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" व परिशिष्ट "ब" नुसार एकूण ०५ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.७९,५४,०९३/-(रुपये एकोणऐंशी लक्ष,चोपन्न हजार, त्र्याण्णव फक्त) एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.६७,०१,२११/- (रुपये सदुसष्ट लक्ष,एक हजार, दोनशे अकरा फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास मंजूरी दिली.

**बाब क्रमांक - १३०.८**

विषय - इमारत क्रमांकः ४५, कामाठीपुरा, ७वी गल्ली ह्या इमारतीस **प्रचलित प्रमाणित मर्यादा रु.२००० प्रती चौ.मी. मंजूरी मिळणे बाबत.**

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.८७ ते ८९ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३०/१११८**

इ.क्र.४५,७ वी गल्लीच्या दुरुस्तीबाबत रु.२०००/- प्रती चौ.मी.च्या मर्यादेत सर्वानुमते मंजूरी प्रदान करण्यात आली.

**बाब क्रमांक - १३०.२**

विषय - **पुनर्विकास**
मुंबई बेटावरील अ वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाकरीता ना हकरत प्रमाणपत्र देण्याबाबतचे प्रस्ताव.

१०. भुकर पहाणी क्र.१८०५ व १८०६, मांडवी विभाग, इ.क्र.३, डोंगरी क्रॉस लेन व १४-१७ जेल रोड, (दक्षिण) मुंबई येथील **'पाटणवाला बिल्डिंग' 'बी विभाग'.**

११. भुकर पहाणी क्र.७८५, मांडवी विभाग, इ.क्र.१६-१८, गरिबदास स्ट्रिट / ६९-७१ दर्यास्थान स्ट्रिट (व्ही.व्ही.चंदन स्ट्रिट), वडगादी, मुंबई-३ येथील **'मदियार मॅन्शन' 'बी विभाग'**.

१२. भुकर पहाणी क्र.९२६, भुलेश्वर विभाग, इ.क्र.५६५-७१ व १, जगन्नाथ शंकर शेठ मार्ग, मुंबई ४००००२ येथील **'सिल्विया हाऊस' 'सी-३ विभाग'.**

१३. भुकर पहाणी क्र.७१०, ७११ आणि ७१२ गिरगांव विभाग, इ. क्र. ८१-८३ **'मणी भवन'**, पारसीवाडा पहिली गल्ली, इ. क्र.७९ **'परमार बिल्डींग'**, खेतवाडी मेन रोड आणि इ.क्र.७५-७७ **'वर्मा बिल्डींग'**, खेतवाडी मेन रोड, मुंबई **'डी-२ विभाग'.**

१४. भुकर पहाणी क्र.४५२, गिरगाव विभाग इ.क्र.६४-७४, खाडीलकर पथ, गिरगाव मुंबई येथील **'न्यु तमाकुवाला बिल्डिंग' 'डी-१ विभाग'.**

१५. भुकर पहाणी क्र.५१५-ए/१० माटुंगा विभाग, प्लॉट क्र.८०२-ए इमारत क्र.१०५,डॉ.बी.ए.रोड, दादर (पूर्व), मुंबई - ४०० ०१४, **'गुलीस्तान बिल्डींग' 'फ-उत्तर विभाग'**.

१६. भुकर पहाणी क्र.५५४/१० व ५५५/१० माटुंगा विभाग, प्लॉट क्र.७३९, इमारत क्र.१, उपकर क्र.फ-उत्तर/६५०० (८), पारसी कॉलनी, रोड क्र.५, दादर माटुंगा इस्टेट, दादर (पूर्व), मुंबई ४०० ०१४, **'कामा बिल्डींग' 'फ-उत्तर विभाग'.**

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ९१ ते ११७ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत, सदर प्रस्तावांवर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १३०/११०९**

मुंबई बेटावरील खालील ७ मालमत्तांवरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचे प्रस्तावांत नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

१०. भुकर पहाणी क्र.१८०५ व १८०६, मांडवी विभाग, इ.क्र.३, डोंगरी क्रॉस लेन व १४-१७ जेल रोड, (दक्षिण) मुंबई येथील **'पाटणवाला बिल्डिंग' 'बी विभाग'.**

११. भुकर पहाणी क्र.७८५, मांडवी विभाग, इ.क्र.१६-१८, गरिबदास स्ट्रिट / ६९-७१ दर्यास्थान स्ट्रिट (व्ही.व्ही.चंदन स्ट्रिट), वडगादी, मुंबई-३ येथील **'मदियार मॅन्शन' 'बी विभाग'**.

१२. भुकर पहाणी क्र.९२६, भुलेश्वर विभाग, इ.क्र.५६५-७१ व १, जगन्नाथ शंकर शेठ मार्ग, मुंबई ४००००२ येथील **'सिल्विया हाऊस' 'सी-३ विभाग'.**

१३. भुकर पहाणी क्र.७१०, ७११ आणि ७१२ गिरगांव विभाग, इ. क्र. ८१-८३ **'मणी भवन'**, पारसीवाडा पहिली गल्ली, इ. क्र.७९ **'परमार बिल्डींग'**, खेतवाडी मेन रोड आणि इ.क्र.७५-७७ **'वर्मा बिल्डींग'**, खेतवाडी मेन रोड, मुंबई **'डी-२ विभाग'.**

१४. भुकर पहाणी क्र.४५२, गिरगाव विभाग इ.क्र.६४-७४, खाडीलकर पथ, गिरगाव मुंबई येथील **'न्यु तमाकुवाला बिल्डिंग' 'डी-१ विभाग'.**

१५. भुकर पहाणी क्र.५१५-ए/१० माटुंगा विभाग, प्लॉट क्र.८०२-ए इमारत क्र.१०५,डॉ.बी.ए.रोड, दादर (पूर्व), मुंबई - ४०० ०१४, **'गुलीस्तान बिल्डींग' 'फ-उत्तर विभाग'.**

१६. भुकर पहाणी क्र.५५४/१० व ५५५/१० माटुंगा विभाग, प्लॉट क्र.७३९, इमारत क्र.१, उपकर क्र.फ-उत्तर/६५०० (८), पारसी कॉलनी, रोड क्र.५, दादर माटुंगा इस्टेट, दादर (पूर्व), मुंबई १४, **'कामा बिल्डींग' 'फ-उत्तर विभाग'.**

सन्मा.सदस्य श्री.बशीर पटेल यांनी मा.मुख्य मंत्री यांचेसोबत सर्व सदस्यांची भाडेकरुंच्या समस्यांबाबत बैठक लावण्याकरीता मा.मुख्यमंत्री यांना विनंती करावी अशी मा.मुख्य अधिकारी यांना विनंती केली.

सन्मा.सदस्य श्री.शरद शिरिषकर यांनी असे सांगितले की, ग/द विभागातील अव्दैता इमारतीमधील दोन गाळयांचा ताबा एकाच व्यक्तीकडे असून त्या व्यक्तीचे निधन झालेले आहे, त्यातील एका गाळयामध्ये कार्यालय स्थापन करण्यात आलेले आहे, त्याचा ताबा दुस-याच व्यक्तीने घेतलेला आहे. तरी याबद्दल सभागृहास माहिती देण्यात यावी. त्याबाबत श्री.सेठ, कार्यकारी अभियंता यांनी माहिती दिली तसेच त्या गाळयात आता वास्तव्य करीत असलेला भाडेकरु हा त्या मूळ भाडेकरुचा वारस आहे किंवा नाही याबद्दल खात्री करुन आवश्यकतेप्रमाणे म्हाड कायद्यातील ६६ चा निष्कासनाचा प्रस्ताव तयार करुन पुढील

बैठकीपूर्वी या संदर्भात कार्यवाही करण्याबाबत मा.मुख्य अधिकारी यांनी उपमुख्य अधिकारी/पु.गा.यांना सूचना दिल्या.

तसेच महानगरपालिकेची जेवढी थकीत पाण्याची देयके असतील ती तात्काळ भरण्यात यावीत अशा सूचना मा.मुख्य अधिकारी यांनी कार्यकारी अभियंता/ग-द विभाग व इतर सर्व कार्यकारी अभियंता यांना दिल्या.

बैठकीच्या अखेरीस मा.उपसभापती तथा मुख्य अधिकारी यांनी सर्वांचे आभार मानून बैठक संपल्याचे जाहिर केले.

सचिव तथा निवासी कार्यकारी अभियंता,
मुं.इ.दु.व पु.मंडळ

मा.उपसभापती तथा मुख्य अधिकारी,
मुं.इ.दु.व पु.मंडळ